# प्रेसनोट

जा.क्र. 229 /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– २७/०४/२०१८

## ''मुलाचा खुन व पत्नीला जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस आजीवन सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे सिहोरा अंतर्गत ग्राम मोहाडी खापा येथिल आरोपी नामे जयेन्द्र छबुलाल शरणागत, वय ५१ वर्ष, रा. मोहाडी खापा, ता.तुमसर जिल्हा भंडारा यास स्वत:चे मुलास लोखंडी सब्बल ने डोक्यावर मारुन खुन केला व पत्नीला जीवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक २७.०४.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे प्रमुख सत्र न्यायाधिश श्री. संजय.आ. देशमुख सा. यांनी आरोपीस आजन्म सश्रम कारावास व ५०००/– रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २५.०८.२०१६ ला तक्रारदार दुर्गाजी छबुलाल शरणागत, वय ३० वर्ष रा. मोहाडी खापा यांनी पोलीस ठाणे सिहोरा येथे तक्रार दिली की, आरोपी व फिर्यादी दोघे भाऊ असुन आरोपी नामे जयेंद्र छबुलाल शरणागत हा मोठा भाऊ असुन एकाच घरात परीवारा सह वेगवेगळे राहतात आरोपी जयेंद्र यास दोन जुळे मुले नामे हरेंद्र व शैलेद्र असे असुन एक मुलगी नामे काजल आहे. आरोपी जयेंद्र हा घटने वेळी रात्री ९.३० वा. दरम्यान दारु पिऊन घरी आला मला पैसे का देत नाही म्हणुन पत्नी व मुलगा हरेंद्र यांचे सोबत भांडण करुन शिवीगाळ करु लागला व जेवन न करता झोपला आरोपीची पत्नी व मुलगी हया घरात झोपल्या व मुलगा हरेंद्र हा बाहेर छपरीत खाटेवर झोपला होता रात्री १०.३० वा दरम्यान फिर्यादी ला पुतन्या हरेंद्र व त्याची आई भागरता यांचा जोराने ओरडण्याचा आवाज आला म्हणुन काय झाले पाहिले असता आरोपी जयेंद्र शरणागत याने घरच्या लोखंडी सब्बलीने मुलगा हरेंद्र शरणागत याचे कपाळावर व डोक्याचे उजवे बाजुला तोडांवर मारले त्यामुळे कपाळातुन व तोडांतुन रक्त निघुन तो जमीनीवर पडला आरोपीचे पत्नीने आरोपीस अडविण्याचा प्रयत्न केला असता तीला सुध्दा डोक्यावर सब्बलीने मारले व सब्बल घेवुन घरुन पडुन गेला हरेंद्र यास लोकांचे मदतीने तुमसर येथे वैद्यकीय उपचारा करीता नेत असता रसत्या मध्ये मरण पावला अशी तक्रार दिली. सदर तक्रारी वरुन पो.स्टे सिहोरा येथे अप.क्र. ३५/१६ कलम ३०२,३०७ भा.द.वि. अन्वये सहा.पो.उपनी. ओमप्रकाश चिचखेडे ब.न. ५०५ यांनी नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक नागेश आर. जायले व त्यांचे पथकाने सुरु केला. तपासात आरोपीस अटक करुन आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मीळुन आल्याने

आरोपी विरुध्द खुन व खुनाचा प्रयत्न करणे या आरोपा खाली दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर गुन्हयाची सुनावणी प्रमुख **जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री.संजय देशमुख सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विनोद बी भोले, जिल्हा सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन एकुन ११ साक्षदार तपासले. आज दिनांक २७.०४.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे** जयेन्द्र छबुलाल शरणागत, वय ५९ वर्ष, रा. मोहाडी खापा, ता. तुमसर **जिल्हा भंडारा** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०२ भादवि अन्वये आजन्म सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड, व कलम ३०७ भा.द.वी. मध्ये ७ वर्ष सश्रम कारावास व २०००/— रूपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, मनोहर कोरेटी, ठाणेदार पोलीस ठाणे सिहोरा यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, बिनझाडे ब.न.१६० व पोना.उमेश सेलोकर ब.न.२० पो.स्टे. सिहोरा यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.**

(एस.बी.ताजने)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक
(गृह)
दुरध्वनी क्र.०९५४५९९७०२५

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.